IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# दहशतवाद आणि मानवी हक्कांचा संबंध

**सहा. प्रा. नासीर कासम शेख**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
श्री विठ्ठल रुख्मिणी महाविद्यालय, सवना
ता. महागांव जि. यवतमाळ

**Abstract:**

दहशतवाद व मानवी हक्क या दोन संकल्पना परस्पर विरोधी दिसून येतात. मानवाच्या विकासासाठी मानवाधिकार सकारात्मक आहेत तर दहशतवाद मानवी विकासाच्या आड येत असून नकारात्मक आहे. २१ व्या शतकामध्ये या दोन्ही संकल्पनाची व्याप्ती वाढलेली आहे. दहशतवादी कारवायांनी संपूर्ण जगाला भयभीत व त्रस्त करून सोडले आहे. सामान्य माणसापासून अमेरीकेसारख्या महाशक्तीशाली देशाला सूध्दा दहशतवादयांनी त्रस्त करून सोडले आहे. विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीपुढे दहशतवादयांची विध्वंसक्ता वाढलेली आहे. मानवी हक्कांचे उल्लंघन मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. त्यामुळे दहशतवाद हे मानवाधीकारावरील एक वैश्वीक संकट समजल्या जाते.

**प्रस्तावना –**

आज जगापुढे मोठे संकट आहे ते म्हणजे दहशतवाद व मानवाधिकार दहशतवादामुळे अनेक राष्ट्रांची वित्त व जिवीत हानी झाली आहे. दहशतवादाला बळी पडलेलया राष्ट्रांमध्ये भारत, रशिया, चीन, अमेरिका, ब्रिटन, स्पेन या राष्ट्रांचा उल्लेख करता येतो. या दोन्ही समस्या केवळ गरीब व अविकसीत किंवा विकसनशील राष्ट्रांपूरती मर्यादित न राहता अमेरिकेसारख्या विकसीत राष्ट्रापुढे तिने अनेक आव्हाने निर्माण केली आहेत. दहशतवादामध्ये हिंसाचाराचा जाणीव पूर्वक वापर केला जातो. हिंसेतून दहशत निर्माण करणे आणि अपले उद्दिष्टये साध्य करणे हा त्यामागील हेतू असतो. आपल्या मागण्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घेणे व सरकारला कृती करण्यास भाग पाडणे. यासाठी मोठया प्रमाणात मानवाधिकारांची पायमल्ली होत असते. मानवाधिकारांमध्ये माणसाला आपले जिवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. दहशतवादी अनेक लोकांना मृत्युमूखी पाडत असल्यामूळे मानवाधिकारांचे उल्लंघन होत आहे.

**उद्दिष्टे –**

१) दहशतवाद व मानवी हक्क या संकल्पनेचा शोध घेणे.

२) दहशतवाद व मानवी हक्काच्या संबंधाचा शोध घेणे.

३) दहशतवाद हा गंभीर गुन्हा आहे हयाचा शोध घेणे.

**गृहीतके –**

१) दहशतवादी हल्ल्यामूळे मानवी हक्कांवर परिणाम होतो.

२) दहशतवादी कृत्यामुळे दूरच्या देशांचे नुकसान होते.

३) दहशतवादी कृत्यामूळे देशा देशांमधील संबंध दुरावतात.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोध निबंध पूर्ण करण्यासाठी विविध संदर्भ पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे व इंटरनेटवरील माहिती गोळा करुन प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा वापर करून ऐतिहासिक पध्दतीचा वापर करून प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे.

**दहशतवाद –**

दहशतवाद या संकल्पने बाबत जागतिक स्तरावर वाद निर्माण झालेला आहे. अभ्यासक व संशोधक मंडळी यांचे दहशतवादाच्या व्याख्याबाबत एक मत होत नाही. दहशतवादाच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत आजपर्यंत कुठे ही दहशतवादाची सर्वसमावेशक व्याख्या तयार करण्यात आलेली नाही.

जॉन क्रेटम यांनी असे म्हटले आहे की, “राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकरीता समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भिती व दहशत निर्माण करणे या उद्देशाने केलेली हिंसक गुन्हेगारी म्हणजे दहशतवाद होय.”

**दहशतवादाचा अर्थ –**

राजकीय उद्दिष्टये साध्य करण्याकरीता काही व्यक्तीगत गटांनी, प्रस्थापित शासकीय अधिकाऱ्याच्या बाजूने अगर विरूध्द कारवाई करतांना दहशतीचा अगर हिंसाचाराचा केलेला वापर म्हणजेच दहशतवाद होय.

**दहशतवादाची वैशिष्टे –**

दहशतवादांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) दहशतवादी हिंसक कारवाई करण्यासाठी संघटीत झालेले असतात.

२) दहशतवादी योजनाबध्द पध्दतीने हिंसाचार घडवून आणतात.

३) दहशतवादी विशिष्ट लोकांचा आधार घेवून आधुनिक शास्त्राच्या सहाय्याने समाजात हिंसा घडवून आणतात.

४) हिंसाचार घडवून लोकांच्या मनात, समाजात, देशात भितीचे वातावरण निर्माण करतात.

५) आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी सरकारला अडचणीत आणतात आणि वेळ पडल्यास सरकारला वेठीस धरतात.

६) दहशतवादाला कोणताही एक धर्म नसतो. तो मानवतेच्या विरोधात कृत्य करीत असतो.

७) दहशतवादी हे सार्वजनिक व समाजाच्या मालमत्तेची नासधूस करीत असतात.

अनेक निरापराध लोक, स्त्री, मूले, पूरूष यांची हत्या करणे, मोठया व्यक्तीचे अपहरण करणे, एखाद्या सार्वजनिक ठिकाणी बॉम्ब स्फोट घडवून आणणे, गोळीबार करणे, अफवा पसरविणे अशा प्रकारचे कृत्य दहशतवाद्याकडुन केली जातात.

**दहशतवादाची पार्श्वभुमी –**

२० व्या शतकात व २१ व्या शतकाच्या प्रारंभापासून दहशतवादाने उग्र रूप धारण केलेले आहे. प्राचीन काळापासून दहशतवादाचे रूप कोणत्या न कोणत्या स्वरूपात नागरीकांच्या मनगूटीवर बसले आहे. याची साक्ष इतिहास देतो. फ्रांन्सचा १४ वा लूई याची राजवट ही दहशतवादी प्रकारात मोडते. इसन १७९३ ते १७९५ या कालखंडात फ्रेंच मध्ये दहशतवादीचे प्राबल्य होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्ध खंडात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात साम्यवाद, अराजकतावाद, नाझीवाद आणि फेसिस्ट विचारसरणीतून राजकीय दहशतवादाला खतपाणी मिळाले. पहिल्या व दूसऱ्या महायुध्दानंतर जगाची वाटचाल सोव्हीएट रशिया व अमेरिका यांच्या वर्चस्वाखाली अनेक देशांमध्ये दहशत निर्माण झाली. शितयुध्दाच्या कालखंडात या दोन महासत्तांची दहशत निर्माण झाली. खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा प्रारंभ झाला.

**मानवी हक्क –**

मानवी हक्क म्हणजे मानव म्हणून निसर्गाने जे अधिकार दिलेले आहेत. त्याला मानवी हक्क असे म्हणतात. मनुष्याची प्रतिष्ठा स्त्री-पुरूषांची समानता आणि सामाजिक संदर्भात त्यांचे स्वातंत्र्य या सर्वांचा मानवी अधिकारांत समावेश होतो.

**सेंट थॅमसच्या मते –**

"मानवाला स्वत:चे जीवन सुकर व्हावे या दृष्टीने जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत त्याला मानवी हक्क म्हणतात."

२४ ऑक्टोंबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्राची निर्मीती झाल्यानंतर जानेवारी १९४७ च्या दरम्यान मानवी हक्कांवरील आंतरराष्ट्रीय कायदयाचा मसूदा तयार करण्यासाठी मानवी हक्क आयोगाची सभा १० डिसेंबर १९४८ रोजी होवुन संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ३० कलमी मानवी हक्कांची सनद मंजूर केली.

**दहशतवाद व मानवाधिकार –**

दहशतवाद व मानवाधिकार यांचा अन्वयार्थ विचारात घेतल्यास दहशतवाद आणि मानवी हक्क या दोन्ही बाबी एकमेकांच्या परस्पर विरूध्द आणि भिन्न आहेत. दहशतवाद ही विध्वंसक अमानवी तर मानवी हक्क ही विधायक व मानवी अशा आहे. एक मानवाला मानवापासून मानवाच्या मानुसकीपासून तोडते. तर दूसरी मानवाला मानवाशी, मानवाला माणूसकीशी जोडते, जवळ आणते. एकांत अनिती तर दूसऱ्यांत निती आहे. दहशतवाद हे दुधारी शस्त्र आहे. तर मानवी हक्क मानवी आचरणाचे उपयुक्त शस्त्र आहे. एक जगाने नाकारले ती बाब असून दूसरी जगाने स्विकारलेली बात आहे.

एक वाईट चितते तर दूसरी चांगले चितते. एक दहशत, बळजबरी, दडपशाही, शोषण, अत्याचार इत्यादी आपल्यात दूसऱ्याचे प्रेम, सामजस्य, स्वातंत्र्य, समता, बंधूता इत्यादी आपल्या दोघांची वैशिष्टये, उद्दिष्टये यामध्ये केवळ विरोध नव्हे तर व्याघाती संबंध आहे.

जगाच्या काना कोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या दहशतवादी संघटनाचे अस्तित्व आढळते. त्यामुळे मानवी हक्कांची संरक्षणाची जबाबदारी गंभीर समस्या बनली आहे. दहशतवादाचे स्वरूप जस जसे वाढत गेले तसे त्यांचे लक्ष ही बदलले आहे. त्यामूळेच मानवी हक्कांच्या हननाची व्याप्ती वाढलेली आहे. दहशतवादयाकडून वापरली जाणारी शस्त्रास्त्रे, अत्याधूनिक असल्यामूळे आता दहशतवादी गटांना व्यापक जनसंहार करणे शक्य झाले आहे.

राज्यघटना मग ती कोणत्याही देशाची असो तीने दिलेले मूलभूत अधिकार व मानवी हक्कांच्या उपभोगासाठी लोकशाही शासन, कायदा व सुव्यवस्था स्थिती, नि:पक्ष न्यायालये आणि निर्भयता यांची आवश्यकता असते. परंतु दहशतवादी या सर्वांवर आघात करून ते नाकारतात. २१ व्या शतकात दहशतवादाने लक्षावधी लोकांचा बळी घेतला असून शत्रूवर नियंत्रण मिळविण्यासाठी केलेल्या कृत्यामूळे नागरीकांचे संविधानीक मानवी हक्क नाकारले जातात.

**निष्कर्ष –**

मानवी हक्क व दहशतवाद हया दोन संकल्पना वेगळया स्वरूपाच्या असल्यामूळे एक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारी आहे. तर दूसरी मानवाचे जीवन नेस्तनाबूत करणारी आहे असे दिसून येते. तर दहशतवाद हा मानवी संस्कृतीमध्ये अराजकता निर्माण करणारा त्यामूळे २१ व्या शतकात दहशतवादाचे आव्हाने संपूर्ण जगाला चांगलेच भेडसावत आहे.

**संदर्भ सूची –**

१) प्रा. उदगांवकर म.न.- २१ व्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लीकेशन्स, पूणे, २००९

२) ॲड देशमूख अरूण, मानवी हक्क आयोग, डिसेंबर, २०१०

३) प्रा. लोटे रा.ज., राजकीय सिध्दांत, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर

४) चौरसिया राधेशाम, संयुक्त राष्ट्रसंघ, अटलांटीक पब्लीकेशन, दिल्ली, २००९

५) Human universal Declaration of Human right.

६) www.humanrights.org

७) www.dahashadwad.info.in